माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ११९/२०२०**

**तक्रारकर्ता श्रीमती निशा काक्लोतर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-२) एन विभाग,**
बृहन्मुंबईमहानगरपालिका, सहा. आयुक्त एन विभाग यांचे कार्यालय,
१ ला मजला, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व) मुंबई -४०० ०७७.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
बृहन्मुंबईमहानगरपालिका, सहा. आयुक्त एन विभाग यांचे कार्यालय,
०३ रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व) मुंबई -४०० ०७७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०७.२०२५**

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ५४३३/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १८८१/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०१.०२.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरीत करण्यात येत आहे."*

तक्रारकर्ता यांनी त्यांचे ईमेल दि. ३०.०६.२०२५ आयोगास सादर करुन नमुद केले की, सदर प्रकरणी त्यांना आवश्यक असलेली माहिती सहाय्यक अभियंता (परिरक्षण- २) एन विभाग यांसकडून प्राप्त झाली असून त्याने माझे समाधान झाले आहे. सदर बाबत माझी कोणतीही तक्रार नाही. तरी महोदयांस विनंती आहे की, माझे अपील निकाली काढण्यात यावे.

तक्रारकर्ता यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०८.०७.२०२५**

8-7-2025
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**